<u>शासकीय कार्यालयीन दूरध्वनी बसविणे</u>
येरवडा मध्यवर्ती कारागृह,महिला तुरुंग येथे
दूरध्वनी बसविण्यास मान्यता देणे.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक-एमएजे-०१९७/७७९/पीआरएस-२.
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२. दिनांक- ९ सप्टेंबर १९९९.

वाचा:- १) कारागृह महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्रमांक-दूरध्वनी/१९९७/कक्ष-३ दिनांक २१.८.९७ व पत्र क्रमांक-दूरध्वनी/१९९७/कक्ष-३(१२३)/दि.५.७.९९.
२) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय,क्रमांक-टीईएल-१०९८/प्र.क्र.१६९/९८/३९, दिनांक ३१.१०.१९९८.
३) गृह विभाग,शासन निर्णय,क्रमांक-एमएजे-०१९७/७७९/पीआरएस-२,दिनांक ५.३.१९९९.

<u>शासन निर्णय</u>:- येरवडा मध्यवर्ती कारागृह,महिला तुरुंग,पुणे येथे दूरध्वनी बसविण्यास व त्यासाठी येणारा खर्च रु.४,०००/- (रुपये चार हजार फक्त) चालू वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्याबाबतच्या प्रस्तावास शासन निर्णय,गृह विभाग,क्रमांक-एमएजे-०१९७/७७९/पीआरएस-२ दिनांक ५ मार्च १९९९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यांत आली होती. तथापि सन १९९८-९९ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर अनुदानातील रक्कम कोषागारातून काढणे शक्य न झाल्यामुळे कारागृह महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडून पुन्हा प्राप्त झालेल्या प्रस्तावास शासन या आदेशाद्वारे येरवडा मध्यवर्ती कारागृह महिला तुरुंग येथे नवीन दूरध्वनी बसविण्यास नव्याने प्रशासकीय मान्यता देत आहे.

२. येरवडा मध्यवर्ती कारागृह,महिला तुरुंग या कार्यालयासाठी नवीन दूरध्वनी बसविण्याबाबतच्या कारागृह महानिरीक्षक यांच्या प्रस्तावास सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय, क्रमांक-टीईएल-१०९८/प्र.क्र.१६९/९८/३९,दिनांक ३१.१०.९८ मधील परिच्छेद ९ ब च्या परंतुकान्वये प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

३. यासाठी होणारा खर्च मुख्य लेखाशिर्ष "२०५६-तुरुंग" मागणी क्र.बी ७-००१ संचालन व प्रशासन-०५ कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा व सन १९९९-२००० च्या मंजूर अनुदानातून भागविण्यांत यावा.

हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,अनौपचारिक संदर्भ क्र.२१२/९८/३९ दिनांक ५.११.९८ अन्वये त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

गु.ज.कुळकर्णी

(गु.ज.कुळकर्णी)
कार्यासन अधिकारी,गृह विभाग,महाराष्ट्र शासन

प्रति,

कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

कारागृह उपमहानिरीक्षक (मुख्यालय) पुणे.

कारागृह उपमहानिरीक्षक, येरवडा, पुणे.

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई

महालेखापाल-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ([illegible])

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ([illegible])

सार्वजनिक बांधकाम विभाग ([illegible]-२) मंत्रालय, मुंबई

कार्यासन अधिकारी, [illegible] मंत्रालय, मुंबई